असा. क्र. १५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**बुधवार, फेब्रुवारी ७, २००१/माघ १८, शके १९२२**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार-अ

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सामान्य प्रशासन विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ फेब्रुवारी २००१

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मभाप. १०९७/१६५२/प्र. क्र. ७२/९७/२०-ब.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, " महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** भाषा परीक्षा नियम, १९८७ " मध्ये सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना " महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** परीक्षा (सुधारणा नियम, २०००) " असे म्हणावे.

२. महाराष्ट्र शासकीय कर्मचारी (उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त) **मराठी** भाषा परीक्षा नियम, १९८७ च्या नियम ४ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) नंतर, पुढील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) जो शासकीय कर्मचारी शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर एक उच्चस्तरीय किंवा निम्नस्तरीय विषय म्हणून **मराठीसह** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि ज्यास ५० टक्क्याहून कमी गुण मिळाले नसतील अशा कर्मचाऱ्यास उच्चस्तरीय किंवा यथास्थिती निम्नस्तरीय परीक्षेच्या परीक्षा (पेपर) एक उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल."

(ब) पोट-नियम (२) व (३) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" (२) शासकीय कर्मचारी,—

(एक) ज्याने **मराठी** ही आपली मातृभाषा असा दावा सांगितला असेल, किंवा

(दोन) ज्याने, **मराठी** ही आपली मातृभाषा आहे असा दावा सांगितलेला नाही परंतु ज्याचे शिक्षण **मराठी** माध्यमातून झालेले आहे आणि जो मराठीसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा उच्चस्तरीय परीक्षा उत्तीर्ण झालेला नाही असा कर्मचारी,—

या नियमातून सूट मिळण्यासाठी पुढील शर्तीची पूर्तता करील :—

(अ) तो देवनागरी लिपीमध्ये सहजपणे लिहिण्यास समर्थ असला पाहिजे,

(ब) त्याने निदान ७ व्या इयत्तेपर्यंत **मराठी** माध्यमातून शिक्षण घेतलेले आहे अशा आशयासंबंधीचे संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे

आणि

(क) तो **मराठीतून** पत्रव्यवहार करू शकतो अशा आशयाचे विभाग प्रमुखांचे/कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र त्याने सादर करणे आवश्यक आहे.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मा. वि. कोकणे,**
शासनाचे सहसचिव.